ePaper

कसबा आणि चिंचवड या दोन्ही जागा भाजपा जिंकेल”; एकनाथ शिंदे



वर्ष - 6 । अंक - 297 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- “एका अपक्षाची गद्दारी खोक्यातून...”
- ‘स्ट्रॉंग रूम’ची तयारी
- आता बॅटिंग सुरू केलीय
- दिल्ली-मुंबई महामार्गाचं उद्घाटन

www.mahaenews.com | ।रविवार , दि. 12 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# भाऊसाहेब भोईरांच्या ‘जखमेवर मीठ’

## » राष्ट्रवादीच्या प्रचारप्रमुखपदी निवड : 2009 पासून शापित संघर्ष कायम

**। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।**

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून महाविकास आघाडीचा प्रचारप्रमुख म्हणून ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर यांची निवड करण्यात आली. २००९ पासून चिंचवडमध्ये विधानसभेचा खरा दावेदार असलेल्या भोईरांवर दिलेली जबाबदारी म्हणजे आजपर्यंत जगतापांविरोधात केलल्या संघर्षच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे.**







### भाऊसाहेबांची ढाल चालते, नेतृत्व नको..?

» वास्तविक, आताच्या पोटनिवडणुकीत भाईर राष्ट्रवादीकडून उमेदवारीसाठी दावेदार होते. पण, नाना काटे यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ घालण्यात आली. ज्या मतदार संघात लक्ष्मण जगताप यांच्या विरोधात सर्वप्रथम दोन हात करण्याची तयारी भोईरांनी ठेवली. त्याच मतदार संघात जगताप यांच्या निधनानंतरसुद्धा उमेदवारी मिळाली नाही. याउलट “ तुम्ही केवळ चिंचवडपुरते मर्यादित आहात..” अशा शब्दांत निवडून येण्याची क्षमता नाही, अशी वागणूक देण्यात आली. त्याच भाऊसाहेब भोईरांना प्रचार प्रमुख पदाची जबाबदारी राष्ट्रवादीला द्यावी लागते. भाऊसाहेबांची ढाल चालते, पण नेतृत्व नको...अशी संकूचित भूमिका राष्ट्रवादीला महागात पडणार आहे, असा ‘ग्राऊंड रिपोर्ट’ आहे. कारण, काँग्रेस, शिवसेनासह सर्वपक्षीय कार्यकर्त्यांमध्ये भाऊसाहेबांवर अन्याय झाल्याची भावना आहे.

### भाऊसाहेब हुकमी इक्का नव्हे, शापित बादशाह...

» कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांना निवडून आणायचेच, या उद्देशाने राष्ट्रवादी कार्यरत झाली आहे. त्याचाच एक भाग म्हणून ज्येष्ठ नेते व राष्ट्रवादीचा हुकमी इक्का असलेले नेते भाऊसाहेब भोईर यांची प्रचार प्रमुख पदी निवड ही करण्यात आली आहे. असा दावा राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांकडून करण्यात येत आहे. मात्र, भाऊसाहेब हुकमी एक्का नाहीत, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संकुचित राजकारणाचा चिंचवड मतदार संघातील शापित बादशाह आहेत. त्यांच्या नेतृत्वाला, अनुभवाला २००९ पासून संधी मिळाली नाही. याउलट, वेळोवेळी त्यांना डावलण्यात आले. भाजपा आणि अपक्ष उमेदवाराच्या विरोधात ढाल म्हणून त्यांच्यावर निवडणूक प्रचाराची जबाबदारी सोपवली, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील अत्यंत निटनिटके आणि तितकेच अभ्यासू नेतृत्व म्हणून भाऊसाहेब भोईरांची ओळख जनमानसात आहे. राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक यासह व्यावसायिक क्षेत्रात राजकारणापलीकडे भाऊसाहेबांचा वकूब आहे. ओघवती वकृत्वकला, प्रभावी संभाषण कौशल्य आणि प्रशासकीय कारभाराची जाण असलेले भाऊसाहेबांचे नेतृत्व आत्मघातकी राजकारणामुळे शापित आहे. असा आतापर्यंतचा चिंचवडकरांचा अनुभव होता. त्यावर पोटनिवडणुकीच्या निमित्ताने शिक्कामोर्तब करण्यात आले. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर चिंचवडमधील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सर्वपक्षीय शोकसभा झाली. शहरातील सर्व दिग्गजांनी आपले अनुभव आणि आठवणी कथन केल्या. त्यात भाऊसाहेबांचा अंतर्मनात खवळलेला समुद्र उफाळून आला होता.



“२००९ पासून पक्षश्रेष्ठींनी कायम माझ्यावर अन्याय केला. ज्यांना अजित पवार यांनी ताकद दिली. पक्षाचे अधिकृत उमेदवार मी असताना अपक्ष उमेदवार निवडून आणला. त्यांनीच पक्षासोबत फारकत घेतली. दादांना माणसं ओळखता आली नाहीत” अशी खंत भाऊसाहेब जाहीरपणे बोलून दाखवतात. २००९ साली चिंचवड विधानसभा निवडणुकीत भाऊसाहेब भोईर यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीकडून काँग्रेसच्या चिन्हावर निवडणूक लढवली होती. त्यावेळी दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. या निवडणुकीत अजित पवार यांनी आघाडी धर्म पाळला नाही. जगताप यांना अप्रत्यक्ष मदत करण्यात आली. त्यामुळे भाईर यांना पराभवाचा सामना करावा लागला. नंतरच्या काळात काँग्रेसमध्ये आहे, म्हणून भाईर राजकीयदृष्टया ‘साईट कॉर्नर’ झाले. २०१४ मध्ये जगताप यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकला आणि भाजपाच्या तिकीटावर निवडणूक लढवली.

त्यावेळी आघाडीच्या जागावाटपात राष्ट्रवादीने या मतदारसंघावर दावा केला. त्यावेळी भाजपाकडून लक्ष्मण जगताप, राष्ट्रवादीकडून नाना काटे आणि शिवसेनेकडून राहुल कलाटे यांची तिरंगी लढत झाली. नाना काटे यांना तीन क्रमांकाची मते मिळाली होती. २०१७ च्या महापालिका निवडणुकीपूर्वी भाऊसाहेब भोईर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काँग्रेसच्या काही नगरसेवकांसह प्रवेश केला. त्यावेळी आर्धी राष्ट्रवादी भाजपात प्रवेश करीत होती. त्या काळात भाईंरांनी राष्ट्रवादीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. ज्या भागात भाजपाला मानणारा वर्ग आहे. त्या भागातून भाईर राष्ट्रवादीच्या तिकीटावर लढले. त्यांना पराभव सहन करावा लागला.

मात्र, स्वीकृत नगरसेवकपदासाठी त्यांना राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींचे उंबरे झिजवावे लागले होते. राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींनी आणि स्थानिक नेत्यांनी वेळोवेळी केलेल्या दगाफटकामुळे भाईरांच्या राजकीय वाटचालीत कायम अडथळे आलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

# “एका अपक्षाची गद्दारी खोक्यातून...”

## शिवसेना बंडखोर राहुल कलाटेंविरोधात बॅनरबाजी, चिंचवडच्या राजकारणात वेगळंच चित्र

।पुणे । महाईन्यूज ।

**राहुल कलाटेंविरोधात बॅनरबाजी पहायला मिळतेय. या बॅनरबाजीमुळे चिंचवडच्या राजकारणात वेगळंच चित्र पहायला मिळतंय. या बॅनरची सद्या चर्चा सुरू झाली आहे.**

चिंचवड पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादीचे नाना काटे यांना उमेदवारी देण्यात आली. त्यानंतर राहुल कलाटे यांनी बंडखोरी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर महाविकास आघाडीत फुट पडल्याचं समोर आलं. त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्रयत्न केले. इतकंच नव्हे तर उद्धव ठाकरेंचा निरोप घेऊन शिवसेना नेते सचिन अहिर हे सुद्धा राहुल कलाटेंच्या भेटीला आले होते. परंतू पक्षप्रमुखांच्या फोननंतरदेखील राहुल कलाटेंनी उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही. त्यानंतर आता राहुल कलाटेंविरोधात बॅनरबाजी पहायला मिळतेय. या बॅनरबाजीमुळे चिंचवडच्या राजकारणात वेगळंच चित्र पहायला मिळतंय. या बॅनरची सद्या चर्चा सुरू झाली आहे.



राहुल कलाटे यांच्या बंडखोरीमुळे चिंचवडची निवडणूक चुरशीची होणार हे नक्की. चिंचवडमध्ये भाजपकडून लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप, महाविकास आघाडीकडून नाना काटे आणि बंडखोरी करत शिवसेनेचे नेते असलेले अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांच्यामध्ये तिरंगी लढत होणार आहे. राहुल कलाटे यांनी २०१९ ला भाजप-शिवसेनेच्या युतीतून बंड केलं आणि खुद्द दिवंगत नेते लक्ष्मण जगताप यांनाच तगडं आव्हान देत १ लाख १२ हजार मते आपल्या पारड्यात खेचून घेतली. आता ते चिंचवड पोटनिवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज भरल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे टेन्शन वाढले आहे. आयत्यावेळी रिंगणात नाना काटेंना उभं केल्याने मुळचे शिवसैनिक असणारे कलाटे या निवडणुकीत नाना काटे भारी पडतील अशी भीती महाविकास आघाडीला होती. म्हणून राहुल कलाटे यांनी माघार घेण्यासाठी ते प्रयत्न करत होते. पण राहुल कलाटेंनी पक्षप्रमुखांच्या फोननंतरदेखील आपला निर्णय ठाम ठेवला आणि अपक्ष उमेदवार म्हणून या निवडणूकीच्या रिंगणात उभे राहिले. त्यानंतर आता त्यांच्याविरोधात बॅनर्स शहरात झळकू लागले आहेत.

चिंचवड येथील चाफेकर चौकात हे बॅनर झळकले आहेत. कोणत्यातरी एका शिवसैनिकाने हे बॅनर्स लावले असावेत, असा अंदाज आहे. कारण त्यावरील आशयच तसा आहे. नाव न घेता राहुल कलाटे यांच्यावर या बॅनरबाजीच्या माद्यमातून निशाणा साधण्यात आला आहे.' एका अपक्षाची गद्दारी खोक्यातून, नागपूरची गुलामी, ठाण्याची गद्दारी एकदम ओक्के डोक्यातून- खरा शिवसैनिक ' अशा अशायाचे हे बॅनर्स आहेत.

### चिंचवडची निवडणूक चुरशीची होणार हे नक्की

**राहुल कलाटे यांच्या बंडखोरीमुळे चिंचवडची निवडणूक चुरशीची होणार हे नक्की. चिंचवडमध्ये भाजपकडून लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप, महाविकास आघाडीकडून नाना काटे आणि बंडखोरी करत शिवसेनेचे नेते असलेले अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांच्यामध्ये तिरंगी लढत होणार आहे. राहुल कलाटे यांनी २०१९ ला भाजप-शिवसेनेच्या युतीतून बंड केलं आणि खुद्द दिवंगत नेते लक्ष्मण जगताप यांनाच तगडं आव्हान देत १ लाख १२ हजार मते आपल्या पारड्यात खेचून घेतली. आता ते चिंचवड पोटनिवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज भरल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे टेन्शन वाढले आहे. आयत्यावेळी रिंगणात नाना काटेंना उभं केल्याने मुळचे शिवसैनिक असणारे कलाटे या निवडणुकीत नाना काटे भारी पडतील अशी भीती महाविकास आघाडीला होती. म्हणून राहुल कलाटे यांनी माघार घेण्यासाठी ते प्रयत्न करत होते. पण राहुल कलाटेंनी पक्षप्रमुखांच्या फोननंतरदेखील आपला निर्णय ठाम ठेवला आणि अपक्ष उमेदवार म्हणून या निवडणूकीच्या रिंगणात उभे राहिले. त्यानंतर आता त्यांच्याविरोधात बॅनर्स शहरात झळकू लागले आहेत.**

# राज्यातील कायदा सुव्यवस्था ढासळली; नाना पटोले

## ‘राज्यात आमदारांवर, पत्रकारांवर, वकीलांवर हल्ले होत असून, जनता असुरक्षित

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**‘राज्यात आमदारांवर, पत्रकारांवर, वकीलांवर हल्ले होत असून, जनता असुरक्षित असताना ५० खोके घेणाऱ्यांच्या सुरक्षेवर दिवसाला २० लाख रुपये खर्च केले जात आहेत. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळलेली असून, राज्याचा व देशाचा कारभार हुकूमशाही पद्धतीने चालवला जात आहे. प्रशासकीय यंत्रणा चुकीच्या पद्धतीने वापरली जात आहे,” अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपवर केली.**

काँग्रेस भवन येथे पत्रकार परिषदेत पटोले बोलत होते. पटोले म्हणाले, “काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गौतम आदानी यांचे काय संबंध आहे असा विचारलेला प्रश्न लोकसभेच्या कामकाजातून वगळण्यात आला. पण पंतप्रधानांना या सर्व प्रश्नाचे उत्तर देशवासीयांना द्यावीच लागतील.

देशातील बँका, एलआयसीमधील पैशाची लूट करण्यात आली आहे. यावर उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी पान टपरीवर चर्चेप्रमाणे मोदी संसदेत भाषण करत आहेत. काँग्रेसने अदानीला मोठे केले असा आरोप भाजप करत असले तरी आमच्या सत्ताकाळात अदानी कुठे होते आणि भाजपच्या आठ वर्षात कुठे पोहोचले याचे उत्तर भाजपने द्यावे.

भाजपच्या विरोधात जनतेच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणात राग आहे. त्यामुळेच विधान परिषद निवडणुकीत त्यांचा पराभव झाला आता कसबा पेठ आणि चिंचवड पोटनिवडणुकीतही महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होतील.

पोट निवडणुकीसाठी काँग्रेसचे केंद्रीय नेते येणार नाहीत, तर शरद पवार हेच आमचे नेते आहेत. शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे हे पुणे आणि पिंपरी चिंचवडला प्रचारासाठी येणार आहेत, असे पटोले यांनी सांगितले.

### जनतेच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणात राग

भाजपच्या विरोधात जनतेच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणात राग आहे. त्यामुळेच विधान परिषद निवडणुकीत त्यांचा पराभव झाला आता कसबा पेठ आणि चिंचवड पोटनिवडणुकीतही महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होतील. पोट निवडणुकीसाठी काँग्रेसचे केंद्रीय नेते येणार नाहीत, तर शरद पवार हेच आमचे नेते आहेत. शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे हे पुणे आणि पिंपरी चिंचवडला प्रचारासाठी येणार आहेत, असे पटोले यांनी सांगितले.

### नमस्काराची अपेक्षा ठेवू नका

**“ही पोटनिवडणूक आपण पक्ष म्हणून लढवत आहोत. उमेदवाराने मला नमस्कार करावा, आपल्याला विचारावे, अशी अपेक्षा ठेवू नका. आपण स्वतः उमेदवार आहोत, असे समजून काम करा. ही निवडणूक आपली ताकद दाखवून राजकीय प्रवासाची सुरवात करण्याची चांगली चांगली संधी आहे, असा सल्ला पटोले यांनी कार्यकर्त्यांना बैठकीत दिली.**



### शॉर्ट न्यूज

#### पुण्यातील शाळकरी मुलांमध्ये वाढतोय ॲडिनोव्हायरसचा संसर्ग

पुणे – ॲडिनोव्हायरस हा एक विषाणू आहे जो श्वासनलिका, आतडे, डोळा, मूत्रमार्गाच्या अस्तरांवर वाढतो. या विषाणूमुळे सर्दी, न्यूमोनिया, पचनासंबंधी आजार आणि मूत्र संसर्ग होऊ शकतो. ज्यांची मुलांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे अशा मुलांवर हा विषाणू परिणाम होतो. शाळकरी मुलांमध्ये ताप येणे, घसा खवखवणे आणि डोळे लाल होणे, जुलाब होणे अशा तक्रारींमध्ये अचानक वाढ झाल्याचं शहरातील बालरोगतज्ञ सांगत आहे. या सगळ्या तक्रारी फक्त लहान मुलांमध्ये जाणवत असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आहे. 70% आजारी मुलांमध्ये ॲडिनोव्हायरसची लक्षणं दिसत आहे. 5 ते 15 या वयोगटातील मुलांमध्ये या व्हायरसचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात जाणवत आहे. हा जीवघेणा आजार नसून आजाराची लक्षणे पूर्णतः निघून जाण्यास किमान 7 दिवसांचा कालावधी लागतो.

# ‘स्ट्राँग रुम’ची तयारी!

## चिंचवड पोटनिवडणूक : ईव्हीएम यंत्राची उमेदवारांना दिली माहिती

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज निवडणूक निरीक्षक एस.सत्यनारायण, निवडणूक पोलिस निरीक्षक अनिल किशोर यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत आज जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींसमवेत निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय,थेरगांव येथे बैठक पार पडली.**



चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले यांनी या बैठकीत निवडणूक विषयक पुढील प्रक्रिया आणि उमेदवारांनी करावयाच्या आवश्यक बाबींची माहिती दिली.

या बैठकीस सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित पाटील, शीतल वाकडे, शिरीष पोरेडी, निवडणूक सहाय्यक तथा तहसीलदार नागेश गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त प्रशांत अमृतकर, निवडणूक कक्ष अधिकारी प्रशांत शिंपी, आचारसंहिता कक्षाचे प्रमुख आबासाहेब ढवळे, माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी किरण गायकवाड, ईव्हीएम यंत्र व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक बापू गायकवाड, पोस्टल मतदान कक्षाचे समन्वयक राजेश आगळे यांच्यासह सेक्टर ऑफिसर तसेच वाकड, सांगवी, देहूरोड, चिंचवड, हिंजवडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उमेदवाराने ठेवायच्या दैनंदिन खर्चाच्या पद्धती, स्ट्रॉंग रूमची तयारी, ईव्हीएम यंत्र व्यवस्थापन, आदी विविध विषयांची सचिन ढोले यांनी माहिती दिली. ते म्हणाले, संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राहील यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. ईव्हीएम यंत्र स्थलांतरीत करताना तेथे उमेदवारांना उपस्थित राहता येईल.

ईव्हीएम यंत्र व्यवस्थापन ही संवेदनशील बाब असून भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे त्यादृष्टीने तंतोतंत पालन केले जाईल. ईव्हीएम यंत्र व्यवस्थापनाची सर्व प्रक्रिया उमेदवारांना पूर्व सूचना देवूनच केली जाईल. मतदान यंत्राची सरमिसळ करताना उमेदवारांना उपस्थित राहता येईल. निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे करण्यास आम्ही कटिबद्ध असून सर्व प्रक्रिया सूत्रबद्ध पद्धतीने कायदा व सुव्यवस्था राखत पार पाडण्यात येईल.

### उमेदवारांना प्रशासनाचे आवाहन...

**» उमेदवारांना कोणतीही अडचण येणार नाही यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात विविध कक्ष स्थापन करण्यात आले असून तेथे सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. खर्चाची मर्यादा आणि त्याचे दरपत्रक यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आले असून त्याप्रमाणे उमेदवाराने स्वतंत्र प्रतिनिधी नेमून दैनंदिन अहवाल निवडणूक खर्च कक्षाकडे सादर करावा. कोणतीही अडचण आल्यास निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन सचिन ढोले यांनी यावेळी केले. उपस्थित उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी विचारलेली माहितीदेखील यावेळी देण्यात आली.**

---

# अश्विनी जगताप यांच्या पाठिशी जनभावना

## खासदार श्रीरंग बारणे : एक लाखांच्या मताधिक्याने निवडून येणार

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी खासदार श्रीरंग बारणे यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेबांची शिवसेना पक्षाची शनिवारी थेरगावमध्ये बैठक झाली. त्यामध्ये खासदार बारणे यांनी अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा एक लाखांहून अधिक मताधिक्याने विजयी करण्याची जनभावना निर्माण झाल्याचे सांगितले. त्यांना मिळणाऱ्या मताधिक्यामध्ये बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचा सिंहाचा वाटा असावा यासाठी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी जोरदार प्रचार सुरू करावा, असे आवाहन त्यांनी केले.**



चिंचवड पोटनिवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारासाठी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या नेतृत्वाखाली थेरगाव येथील दत्त मंदिरात शनिवारी बैठक झाली.

यावेळी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, युवासेना प्रमुख विश्वजीत बारणे, शहरप्रमुख निलेश तरस, उपजिल्हाप्रमुख राजेश वाबळे, शहर संघटक हेमचंद्र जावळे, उपशहरप्रमुख रविंद्र ब्रह्मे, जिल्हा संघटिका शैला पाचपुते, उपजिल्हासंघटिका शारदा वाघमोडे, पिंपरी विधानसभा प्रमुख शैला निकम तसेच भाजपाचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, शहर संघटन सरचिटणीस अमोल थोरात आदी उपस्थित होते.

### बाळासाहेबांच्या शिवसेनेचा सिंहाचा वाटा...

» खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, “अश्विनी लक्ष्मण जगताप या महायुतीच्या उमेदवार आहेत. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड मतदारसंघात अनेक विकासकामे केली आहे. त्याच्या जोरावर अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा पोटनिवडणुकीत विजय निश्चितपणे होणार आहे. मतदारसंघातील जनतेने त्यांना विजयी करून भरघोस मतांनी विधानसभेत पाठविण्याचा निर्धार पक्का केलेला आहे. त्यांना एक लाखांहून अधिक मताधिक्यांनी विजयी करण्याची जनभावनाच निर्माण झालेली आहे. या जनभावनेचा बाळासाहेबांच्या शिवसेनेने आदर करायला हवा. अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मिळणाऱ्या मताधिक्यामध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेचा सिंहाचा वाटा राहावा यासाठी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचा जोमाने प्रचार सुरू करावा, असे आवाहन त्यांनी केले.”

## संपादकीय »

# छमछम...धोक्याची घंटा वाजतेय!

***तरुणांचे वाढते बार प्रेम चिंता करायला लावणारे आहे. वडिलोपार्जित संपत्तीतून मिळालेला पैसा बारमधून सहजपणे उधळण्याच्या प्रवृत्तीला समाजधुरीणींचा विरोध आहे, तशी चिंताही ते वारंवार व्यक्त करीत आहेत. डान्स बार किंवा लेडीज बार चालू ठेवण्यासाठी निश्चित असे नियम आहेत. सर्वोच्च न्यायालयाने डान्स बार बंदी उठविल्यानंतर बार संस्कृती सुसाट झाली आहे.***

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत, तसेच डोंबिवलीच्या पट्ट्यात लेडीज बार, तसेच डान्स बारचे पेव मोठ्या प्रमाणात फुटले आहे. अशी विरंगुळ्याची ठिकाणे असावी की नसावी, याबाबत दोन मतप्रवाह आहेत. अर्थात हा कळीचा मुद्दा असल्याने त्यावरील भाष्य येथे अप्रस्तुत ठरेल, मात्र या बारमधून जमणाऱ्या तरुणांच्या झुंडी लक्षात घेतल्या तर या तरुण पिढीच्या भावी आयुष्याची चिंता वाटल्यावाचून राहणार नाही. हातात नोटांची पुडकी घेऊन बारबालांवर त्याची उधळण करणारी तरुण पिढी बार संस्कृतीच्या पाशात गुरफटून गेलीत, किंबहुना त्यासाठी वेडी झाल्याचे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. बारमधून 'मनी शो' होत असल्याने रायगड आणि ठाणे जिल्ह्यात फोफावलेल्या बार संस्कृतीला स्थानिक प्रशासनाचा मनापासून हातभार लागलेला आहे.

त्यामुळे बारचे मालकही सुशेगात आहेत. त्यांना कुणाचे भय उरलेले नाही. रायगड जिल्ह्यात जमिनीला सोन्याचा भाव आल्यानंतर जमीन विकण्याकडे कल वाढला. सुपीक जमिनीही विकण्यात आल्या. गुलछबू प्रवृत्तीच्या तरुणांनी आलेला पैसा बारमध्ये उडविण्यास सुरुवात केली. मुंबईपुरती मर्यादित असलेली डान्स बार किंवा लेडीज बार संस्कृती नवी मुंबईकडे सरकली आणि असे आज शेकडो बार सुरू झाले आहेत. या बारमुळे परिसरातील आर्थिक व्यवस्थेला किती सुबत्ता आली हा संशोधनाचा विषय असला तरी या व्यवसायातून मूठभरांना रग्गड पैसा मिळू लागला आहे. त्यासाठी नियमांचे तीन तेरा वाजविण्यात आले असून पहाटेपर्यंत मद्य आणि मदिरेत अनेकजण गुरफटून गेलेले असतात.

तरुणांचे वाढते बार प्रेम चिंता करायला लावणारे आहे. वडिलोपार्जित संपत्तीतून मिळालेला पैसा बारमधून सहजपणे उधळण्याच्या प्रवृत्तीला समाजधुरीणींचा विरोध आहे, तशी चिंताही ते वारंवार व्यक्त करीत आहेत. डान्स बार किंवा लेडीज बार चालू ठेवण्यासाठी निश्चित असे नियम आहेत. सर्वोच्च न्यायालयाने डान्स बार बंदी उठविल्यानंतर बार संस्कृती सुसाट झाली आहे.

# ध्येयपूर्ती




...

ध्येय नसेल तर नुसते चालत राहण्यात काही अर्थ नसतो. मग कसं काय ध्येय निश्चित करावं आणि त्याचा पाठपुरावा करावा याविषयी थोडक्यात सांगण्याचा आजच्या लेखातून प्रयत्न केलाय. प्रत्येकालाच ध्येय गाठायचे असते. तुम्हालाही ध्येयपूर्तीचा ध्यास असेलच, मग त्यासाठी तुम्ही काय काय करू शकता ते एकदा नक्कीच पडताळून पाहायला हवं.

स्वप्नवत जीवन जगणे आणि स्वप्नात जगणे या दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत. म्हणजे स्वत: कोणतेही कष्ट न घेता फक्त हे असं घडलं पाहिजे ते तसं झालं पाहिजे हे बोलत राहणे म्हणजे स्वप्नात जगणे आणि मोठ्या मेहनतीने, संयमाने आपली उद्दिष्टे पूर्ण करीत स्वप्नवत जीवन जगणे आहे. ध्येय गाठण्यासाठी स्वप्न आणि कल्पनांमधून बाहेर पडून प्रत्यक्ष कृतिशील बनायला हवे.

ध्येय निश्चित केल्यानंतर बऱ्याच वेळा थेट परिणामांवर लक्ष दिले जाते. ध्येयपूर्ती झाल्यावर काय काय होईल या जर तऱ्हा जगात वावर सुरू होतो. ज्याने लाभ तर काहीच नाही, परंतु वेळेचा अपव्यय होतो एवढे मात्र नक्की. मग त्याऐवजी तिथपर्यंत पोहोचण्याच्या मार्गावर लक्ष केंद्रित केले तर परिणाम निश्चितच चांगले मिळतील.

दुसरा करतोय म्हणून एखादे काम केले की माणसाचा रोबोट झालाच म्हणून समजा. त्यापेक्षा समजून उमजून काम केले तर ध्येय गाठणे सहज शक्य होईल. मग त्यासाठी आवडीचे काम निवडा. त्यानंतर आयुष्यात तुम्हाला एकही दिवस काम करावे लागणार नाही. कोणत्या कामासाठी किती वेळ द्यायचा आणि कुठे थांबायचे हे कळायला हवे. कुठे थांबायचे हेच माहीत नसल्यास तुम्ही तुमची शक्ती वाया घालवाल. आपण यांत्रिक युगात वावरत आहोत. त्यामुळे इथे प्रत्येक वेळी इंधनाची आवश्यकता असते. मग गाडीला ज्याप्रमाणे इंधन लागते त्याप्रमाणे मानवी शरीरालासुद्धा इंधन लागते. मग हे इंधन आपल्या व आजूबाजूच्या सकारात्मक ऊर्जेमुळे मिळत असते. थोडं थांबल्याने आपला झालेला प्रवास आपल्याला आठवता येतो, झालेल्या चुका टाळता येतात आणि मुख्य म्हणजे तिथून दिसणारा आपला रस्ता अगदी आखीव रेखीवपणे पाहता येतो.

प्रबळ इच्छाशक्तीसाठी प्रत्येक मनुष्य धडपडत असतो. इच्छाशक्ती एकवटणे तसे कठीण काम. आज ध्येयापासून दूर नेणाऱ्या इतक्या गोष्टी आहेत की त्यातून स्वत:ला सावरणे अवघड असते. स्वत:ला योग्य मार्गावर ठेवायचे असेल तर छोट्या छोट्या गोष्टींचा सराव केला पाहिजे. याच छोट्या गोष्टी मोठे बदल आयुष्यात घडवून आणतात. एखादी छोटी सवय जर बदलायची असेल तर त्या बदलाविषयी स्वत:ला नेहमी सांगत राहा. वाईट व्यसन तुम्ही करीत असाल आणि मनापासून सोडू इच्छित असाल तर मनाला सतत सांगत जा की, मला हे सोडायचं आहे. स्वत:वर ताबा ठेवण्यासाठी छोट्या छोट्या गोष्टी सतत करत जा. याने इच्छाशक्ती वाढेल आणि नक्कीच फायदा होईल. तुम्ही प्रत्येक गोष्ट पूर्ण करण्याच्या मागे लागाल तर इतर कामे तशीच राहतील. त्यामुळे एका वेळी एकच काम हाती घ्या आणि पूर्णत्वास न्या. एक समस्या दूर करण्याऐवजी एक पाऊल यशस्वीरित्या टाका. यामुळे पुढे जाता येईल. लक्षात ठेवा की यशस्वीपणाने टाकलेले एक छोटे पाऊल तुमचे अख्खे जीवन बदलून टाकू शकते.

आपण जेवढी अधिक आपली प्रगती साधत राहाल, तेवढे अधिक कामाशी जोडले जाल. असे करताना आपण इतरांची मदत घेऊ शकता. स्वत:ला मोनिटर करीत राहिल्याने स्वत:मधील बदल कळतात व अजून कशी प्रगती साधू शकतो हेदेखील समजते. चूक झाली तर त्यात बदल करू शकतो. चुकलात आणि त्यात सुधारणा केली नाही तर ती तुमची चूकच मानली जात असते.ध्येय गाठणे अवघड वाटल्यास प्रयत्नांत बदल करायला हवा, ध्येयात नाही. ही साधी गोष्ट आपल्या लक्षात येत नाही आणि मग साधे सरळ आयुष्य अवघड होऊन बसते. खरे पाहायला गेले तर जीवन सोपे आहे, पण त्याला अवघड बनवणारे आपणच असतो. आपल्या आत डोकावून पाहिल्यास त्यात काही चुकीचे आढळत नसल्यास मग काळजी कशाची? भीती का? भीतीच्या दुसऱ्या बाजूला खरे यश असते.

त्यात पण स्वत:पेक्षा दुसऱ्याच्या आयुष्याचा अधिक विचार केल्याने आपलाच ऱ्हास होतो हे समजत नाही, मग स्वत:च्या अंगणात घाण साचलेली असताना शेजारच्या घराचे छत घाण असल्याची तक्रार करायला सुरुवात होते. वैयक्तिक ऱ्हासाचे कारण बनण्यापेक्षा स्वत:ची ध्येयपूर्ती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जगाला सुधारण्यासाठी आधी देशाला सुधारायला हवे. देशाला सुधारण्यासाठी आधी कुटुंबाला सुधारले पाहिजे. कुटुंबाला सुधारण्याआधी स्वत:च्या आयुष्याला सुधारले पाहिजे.

# कौटुंबिक पालकत्व महत्त्वाचे

**मुलांना शिकवायचे एक आणि अनेकदा आपल्या वागणुकीतून त्यांच्यापर्यंत वेगळेच काही तरी पोहोचवायचे. यामुळे मूल गोंधळते. अशा वेळेस पाल्याच्या मनात गोंधळ निर्माण होतो. काय वागावे, कसे वागावे हे त्यांच्या लक्षात येत नाही. परिणामी, व्यक्तिमत्त्व विकासात अडचणी येत जातात.**

पालकत्व हे बहुअंगी आणि बहुआयामी असते. अन्न, वस्त्र, निवारा आणि प्रेम या इतकेच जगण्यासाठी पोषक वातावरण हे संवेदनशील मूल आणि पर्यायाने चांगला माणूस घडवत असते. आई-वडिलांचा पालकत्वात मोठा वाटा असला, तरीही भारतासारख्या देशात मुले बऱ्याचदा विस्तारीत कुटुंबात वाढतात. फक्त जैविक पालकच नाहीत, तर आजी-आजोबा, काका-काकू, आत्या, मामा-मावशी तसेच घरकामाच्या, बालकाची काळजी घेणाऱ्या ताई, पाळणाघरातल्या काळजीवाहू व्यक्ती, शेजारी, जवळची-विश्वासाची माणसे जी नियमित घरी येतात, बालकांच्या संपर्कातले असे सगळे जण विस्तारीत कुटुंबाचा भाग असतात. यांचा बालकाच्या विकासात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असतो, हे आपल्याला मान्य करावे लागेल.

अर्थातच आपल्यावर अवलंबून असणाऱ्या सगळ्याच बालकांचे बालपण सुखाचे, सुरक्षित, सुंदर व ताणविरहित करणे ही 'कुटुंबीय पालक' म्हणून आपल्या



सगळ्यांचीच एकत्रित जबाबदारी आहे. मुले जसजशी मोठी होत जातात, त्यांचा घरातला, घराबाहेरचा वावर वाढतो; तसे संपर्कातल्या व्यक्तींबरोबरचे नाते तयार होत असते. या नात्यांमधले अनुभव बालकाला परस्पर अवलंबन, प्रेम, विश्वास, आनंद, आदर, राग, दु:ख, हतबलता, असहायता, भीती अशा सकारात्मक आणि नकारात्मक या भावनांची ओळख करून देत असतात. घरात व घराबाहेर मोठ्या व्यक्ती एकमेकांशी कशा वागतात, त्यांचे एकमेकांसोबतचे नातेसंबंध कसे आहेत याचे निरीक्षण बारकाईने सुरू असते. यातूनच मूल जे त्यांच्या समजेप्रमाणे उचलत असतात, तेच 'संस्कार' बालकांवर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे होत असतात.

### कौटुंबिक नातेसंबंध आणि बालके

पुरुषप्रधान समाजात स्त्री-पुरुष असमानता सगळ्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग आहे व हे नैसर्गिकच आहे, हा सगळ्यांनी सोयीने करून घेतलेला समज आहे. घरात मुलगे-मुली, पुरुष व स्त्रियांसाठी असणारे वेगळे नियम, कामांची विभागणी, दोघांना दिली जाणारी असमान वागणूक व त्यातून निर्माण होणारे तणावाचे वातावरण यांचा बालकांच्या मनावर परिणाम होत असतो. मुलांमध्ये श्रेष्ठत्वाची भावना वाढीला लागते, तर मुलींमध्ये कमीपणाची भावना निर्माण होऊ लागते व हे बिंबवण्याचे कामही मोठ्यांच्या वर्तनातून होत राहते. अनेकदा घरातील सदस्यांमध्ये मतभेद, मनभेद असतात. नात्यांमध्ये भेदभाव, चढाओढ व तुलना असते. त्याचे पडसाद घरामध्ये वारंवार उमटतात. वादविवाद, भांडणे, घालून पाडून बोलणे, अबोला हे त्याचे मूर्त स्वरूप असते. घरातील मोठ्या माणसांमधील राजकारणाचा बालकांच्या मनावर परिणाम होत असतो.

## ।। अभंगवाणी ।।



निंदी कोणी मारी ।
वंदी कोणी पूजा करी ॥१॥
मज हें ही नाहीं तें ही नाहीं ।
वेगळा दोहीं पासुनी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)


# आता बॅटिंग सुरू केलीय!

## 2024 ला आम्हीच मॅच जिंकणार, देवेंद्र फडणवीसांचा निर्धार

। नाशिक। महाईन्यूज ।

**"आता ट्वेंटी-ट्वेंटी मॅच सुरू केली असून आगामी निवडणुकीसाठी भाजपचा नवा संकल्प साकारण्यासाठी सर्वांनी कामाला लागा. पदं मिळतील, मिळणार नाहीत, पुढच्या निवडणुकीपर्यंत सर्व सोडा, सेवा करून लोकांचा विश्वास संपादन करा, त्यानंतर वर्षानुवर्ष जनता आपल्याला सत्तेमध्ये ठेवेल, त्यामुळे आता आपण बॅटिंग सुरू केलीय, 2024 ला आपणच मॅच जिंकणार असा निर्धार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.**

नाशिकमध्ये दोन दिवशीय भाजप कार्यकारिणीची बैठक पार पडली. आजच्या समारोपाप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी आगामी निवडणुकांसाठी भाजपचे मिशन 200 ची घोषणा केली. त्याचबरोबर महाविकास आघाडीवर जोरदार निशाणा साधला. दुसरीकडे आगामी निवडणुकासांठी भाजप कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावं असं आवाहन त्यांनी केले. "समर्पण भावनेने सर्वांनी मैदानात उतरून काम करा. आपल्याला जनतेसाठी काम करायचं आहे. त्यामुळे अहंकार बाजूला ठेवा, आपल्याला काम करण्याची संधी मिळणार आहे, त्यामुळे आपलं समर्पण आपल्या पक्षासाठी मी मागतो आहे, असे आवाहन त्यांनी यावेळी



भाजप कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांना केले. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "जर सर्वोच्च न्यायालयाने यांच्या बाजूने निकाल दिला तर सर्वोच्च न्यायालय उत्तम आणि जर यांच्या बाजूने निकाल दिला नाही तर दबावाखाली निकाल दिला असं म्हटलं जातं. देशातील सर्वोच्च संस्थांवर प्रश्न उपस्थित करण्याचे काम विरोधक करत आहेत. हे खरं म्हणजे विरोधकांचं फस्ट्रेशन आहे. आगामी निवडणुका त्यापेक्षा दीडपट जास्त जागा घेऊ, कारण जनता आपल्या सोबत आहे. शिंदे भाजप सरकारने केवळ सहा महिन्यांमध्ये शेतकऱ्यांना भरीव मदत दिली आहे. त्या सरकारने केवळ घोषणा केल्या. एक रुपयाही शेतकऱ्यांच्या खात्यावर दिला नाही."अडीच वर्षात तुम्ही जनतेसाठी काय केलं त्यातील एक तरी गोष्ट सांगा, शेतीसाठी घेतलेला निर्णय दाखवा, उद्योगासाठी घेतलेला एक निर्णय दाखवा, फक्त भ्रष्टाचार दिसून आला.

### हे गद्दारांचे नव्हे तर खुद्दारांचे सरकार

**देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महाविकास आघाडीवर जोरदार निशाणा साधला. "आज जे महाराष्ट्रात सरकार आलंय, ते गद्दारांचं सरकार नसून खुद्दारांचं सरकार आहे. हिंदुत्वासाठी ज्यांची खुद्दारी आहे, ज्यांची विचारांसाठी खुद्दारी आहे असं हे सरकार आहे. गद्दारांना खाली पाडून आपल्या सोबत खुद्दार आले आणि आपण महाराष्ट्रात नवं सरकार उभं केलं. म्हणून खुद्दार आपल्या सोबत आहेत. शिवसेनेच्या उरलेसुरल्यांना थांबवण्यासाठी सर्व सुरू आहे. हे बेकायदेशीर आहे, ते बेकायदेशीर आहे, मी सांगतो आपण जे केलं आहे ते नियमात आहे, कायद्यात आहे. सर्वोच्च न्यायालयात आपल्या बाजूने निकाल येईल, हे मी ठासून सांगतो, असा विश्वास यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

---

# पत्रकार वारिसे मृत्यू प्रकरणाची एसआयटीकडून चौकशी!

## गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांचा निर्णय

। नाशिक । महाईन्यूज ।

**शशिकांत वारिसे यांचा 6 फेब्रुवारी रोजी अपघात झाला होता. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर उपचारासाठी त्यांना कोल्हापुरातील रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. परंतु, उपचार सुरू असतानाच 7 फेब्रुवारी रोजी त्यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आरोपी कारचालक पंढरीनाथ आंबेरकर याला अटक करण्यात आली असून हा अपघात नसून घातपात असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांनी केंद्रीय मंत्री नारायण राणेंवर गंभीर आरोप केले आहेत. शिवाय हा मुद्दा उचलून धरला होता.**

दरम्यान, या प्रकरणी शिवसेना खासदार संजय राऊत आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील या प्रकरणाची सखोर चौकशी व्हावी अशी मागणी केली होती. "शशिकांत वारिसे यांची हत्या प्रकरण अतिशय गंभीर असून या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी," अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे. तर संजय राऊत यांनी या प्रकरणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देखील लिहिंलं होतं. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करू असे म्हटले आहे. "वारिसे यांच्या मृत्यू प्रकरणात सखोल चौकशी करू. शिवाय हे प्रकरण फास्टट्रॅकमध्ये कसं नेता येईल हे बघू असं देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

रिफानरीच्या मोठ्या आर्थिक घोटाळ्यातून शशिकांत वारिसे यांची हत्या झाली असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केलाय. "व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रकल्पाच्या आसपास जमिनी विकत घेतल्या आहेत. हे कोण व्यापारी आहेत याची यादीच जाहीर करणार असल्याचं संजय राऊतांनी सांगितलं. आमचे स्थानिक आमदार वारिसे कुटुंबियांच्या संपर्कात आहेत. माझी मागणी आहे की वारिसे कुटुंबियांना तातडीनं 50 लाखांची मदत द्यावी. हा सरकारनं



केलेला खून असल्याचा आरोपही राऊतांनी केला. मला पण याबाबत दोनदा धमकी आली आहे की वारिसेंचा मुद्दा उचलाल तर तुमचाही वारिसे करू. पण एका पत्रकाराची हत्या ही एका सैनिकाची हत्या आहे.

### काय आहे प्रकरण?

राजापूर तालुक्यातील 'महानगरी टाईम्स' या वृत्तपत्राचे पत्रकार शशिकांत वारिसे यांचा 6 फेब्रुवारी रोजी अपघात झाला. त्यानंतर उपचार सुरू असताना 7 फेब्रुवारी रोजी त्यांचा मृत्यू झाला. राजापूर येथील पेट्रोल पंपावर त्यांना थार गाडीने जोरात धडक दिली होती. शशिकांत वारिसे यांचा हा अपघात नसून घातपात असल्याचा आरोप रिफायनरीविरोधी संघटनेने केला आहे. रत्नागिरीतील पत्रकार शशिकांत वारिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कार चालक पंढरीनाथ आंबेरकर याला सोमवारी रात्री अटक करण्यात आली. पोलिसांनी आरोपीला कोर्टात हजर केल्यानंतर आरोपीला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

---


# राज्यातील सत्तांतराचे गुपित उलगडणार?

## शिंदे-फडणवीस शपथविधीबाबत माहिती आयोगाने राज्यपाल कार्यालयाकडून मागितली कागदपत्रे

। मुंबई । महाईन्यूज ।

माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष जाधव यांनी राज्यात झालेल्या सत्तांतराबाबत मागितलेली कागदपत्रे कार्यालयात नसून ती राज्यपालांकडे असल्याचे सांगण्यात आले होते. राज्य माहिती आयोगाकडे होणाऱ्या सुनावणीत राज्यपाल सचिवांना कागदपत्रांसह सुनावणीला हजर राहण्याचे आदेश माहिती आयोगाने दिले आहेत. माहिती आयुक्त यावेळी कोणते आदेश राज्यपाल सचिवालयाला देतात त्यातून राज्यातील सत्तांतराचे गुपित उलगडणार आहे. त्यामुळे 28 तारखेला होणाऱ्या सुनावणीकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

30 जून रोजी राज्यात सत्तांतर होवून शिंदे-फडणवीस सरकार स्थापन झाले. हे सरकार स्थापन करताना राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी घटनेने घालून दिलेल्या कार्यपद्धतीत सदर काम केले आहे किंवा नाही हे जाणून



घेण्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष जाधव यांनी अनेक दस्तऐवजांची मागणी राज्यपाल सचिवालयाकडे केली होती. त्यामध्ये उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यानंतर कोणत्या पक्षाने सत्तास्थापनेचा दावा केला, राज्यपाल महोदयांनी कोणत्या पक्षाला सत्ता स्थापन करण्याचे आमंत्रण दिले या माहितीचा समावेश होता. तसेच महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे कोणत्या आमदारांनी पक्षाच्या व्हिपचे उल्लंघन करुन विधानसभा अध्यक्षांच्या निवडणुकीत मतदान केले याची माहिती मागितली होती.

यावर राज्यपाल सचिवालयाने सदर माहिती कार्यालयात उपलब्ध नसून ती राज्यपालांकडे असल्याची माहिती दिली.

# पंतप्रधान मोदी रविवारी करणार दिल्ली-मुंबई महामार्गाचं उद्घाटन!

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या महामार्गाचा व्हिडीओ टाकला सोशल मीडियावर

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाचा पहिला टप्पा तयार झाला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या महामार्गाचा व्हिडीओ सोशल मीडियावर टाकला होता, त्यानंतर या महामार्गाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरु आहे. रविवारी (12 फेब्रुवारी) पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) या महामार्गाचं उद्घाटन करणार आहेत.**

केंद्र सरकारच्या मुख्य प्रकल्पांमध्ये समाविष्ट असलेल्या दिल्ली मुंबई-एक्स्प्रेस वेच्या पहिल्या टप्प्याचे (246 किमी) काम पूर्ण झाले आहे, ज्यासाठी सुमारे 12,150 कोटी रुपये खर्च आला आहे. पूर्ण झाल्यानंतर हा एक्स्प्रेस वे देशातील सर्वात मोठा एक्स्प्रेस वेअसेल. ज्याची लांबी 1,386 किमी असेल. हे काम पूर्णपणे तयार झाल्यानंतर दिल्ली ते मुंबईहे अंतर 1,242 किमी होईल, जे आता 1424 किमी आहे. तसेच प्रवासाचा वेळ देखील 24 तासांवरून 12 तासांपर्यंत कमी होईल, म्हणजेच हा वेळ जवळजवळ निम्मा होईल. सध्या हा द्रुतगती मार्ग 8 लेनमध्ये तयार करण्यात येत असून भविष्यात 12 लेनचा बनवला जाऊ शकतो. जनावरांना रस्ता ओलांडण्यासाठी या एक्स्प्रेस वेमध्ये ॲनिमल पास बनवले जाणार आहेत, जेणेकरून जनावरांमुळे होणारे अपघात टाळता येतील.

उद्योगपती आनंद महिंद्रा देखील हा व्हिडीओ पाहिल्यानंतर आपली प्रतिक्रिया दिल्याशिवाय राहू शकले नाहीत. रिट्विट करत त्यांनी लिहिले, "तुम्ही आम्हाला आठवण करून देत आहात की इन्फ्रास्ट्रक्चर बोरिंग नाही, तर ही एक जादूही असू शकते."



# संसदेतील पत्रकारांवरील निर्बंध आता हटवा

## 'एडिटर्स गिल्ड चे पीठासीन अधिकाऱ्यांना पत्र

।हरियाणा । महाईन्यूज ।

कोरोना महामारीच्या काळात संसदेच्या परिसरात प्रवेश करण्यास प्रसार माध्यम प्रतीनिधींवर लावण्यात आलेले निर्बंध अजूनही कायम असल्याबद्दल नापसंती व्यक्त करतानाच देशात इतरत्र कोरोना निर्बंध मागे घेण्यात आले असताना फक्त संसदेत व तेही पत्रकारांच्या प्रवेशावरील निर्बंध हटवावेत अशी मागणी एडिटर्स गिल्ड ऑफ इंडियाने पत्राद्वारे केली आहे.

१९५२ मध्ये संसदेच्या पहिल्या अधिवेशनापासून (२०२० पर्यंत) मुद्रित आणि तदनंतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांना संसद अधिवेशन करण्याची परवानगी देण्यात आली आहे याकडेही लक्ष वेधण्यात आले आहे.

एडिटर्स गिल्ड ने याबबात लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांना पत्रे लिहीली आहेत. कोरोना काळात २०२० च्या पावसाळी अधिवेशनापासून संसदेत पत्रकारांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले होते. त्यानंतर कोरोना लसीकरणाने वेग



जवळपास सपुष्टात आली आहे. खुद्द दिल्लीत बाजारपेठा, मेट्रो, डीटीसी या बस आदी ठिकाणचे कोरोना नियम पूर्ण मागे घेतल्याची परिस्थिती आहे. मेट्रो, बस व बाजारपेठा गर्दीने ओसंडून वाहत आहेत. संसदेतही कामकाज पाहण्यास येणाऱ्या अभ्यागतांचा प्रवेश पूर्ववत करण्यात आला आहे.

विविध खासदारांच्या शिफारसी घेऊन येणारे विद्यार्थी व इतरांच्या प्रवेशांना सूट देण्यात आली आहे. संसद परिसरात आता फारसे कोणी मास्कही वापरत नाहीत. मात्र सरकारने या सर्वांना एकमेव अपवाद केला आहे तो पत्रकारांचा.विशेषतः लोकसभा सचिवालयाने याबाबत जी कठोर भूमिका घेतली ती अनावश्यक व विसंगत असल्याचे मत व्यक्त होते.

### पत्रकारांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले

**एडिटर्स गिल्ड ने याबबात लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांना पत्रे लिहीली आहेत. कोरोना काळात २०२० च्या पावसाळी अधिवेशनापासून संसदेत पत्रकारांच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले होते. त्यानंतर कोरोना लसीकरणाने वेग घेतल्यावर देशात महामारीचा प्रभाव कमी होत गेला व आरोग्य निर्बंधही हटविण्यात आले. आता तर मास्कची सक्तीही जवळपास संपुष्टात आली आहे. खुद्द दिल्लीत बाजारपेठा, मेट्रो, डीटीसी या बस आदी ठिकाणचे कोरोना नियम पूर्ण मागे घेतल्याची परिस्थिती आहे. मेट्रो, बस व बाजारपेठा गर्दीने ओसंडून वाहत आहेत. संसदेतही कामकाज पाहण्यास येणाऱ्या अभ्यागतांचा प्रवेश पूर्ववत करण्यात आला आहे.**

# शेतकऱ्यांकडून पुन्हा मोठ्या आंदोलनाची तयारी

## 20 मार्चला संसद भवन परिसरात ठोकणार तळ

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।



देशाची राजधानी दिल्ली पुन्हा शेतकऱ्यांनी मोठ्या आंदोलनाची तयारी सुरु केली आहे. संयुक्त किसान मोर्चाच्या आवहानानंतर देशभरातील अनेक शेतकरी 20 मार्च रोजी संसद भवनावर जमणार आहेत. हे शेतकरी 20 मार्चला संसद भवनात तळ ठोकणार आहेत. भाकियुचे प्रवक्ते चौधरी राकेश टिकैत यांनी सांगितले की, 26 जानेवारी 2024 रोजी शेतकरी देशभरात ट्रॅक्टर परेड काढतील. हक्कासाठी लढा सुरूच राहील. शेतकऱ्यांनी जमीन आणि पिढ्या वाचवण्यासाठी 20 वर्षे आंदोलनासाठी तयार राहावे. शेतकऱ्यांना कर्ज नाही तर एमएसपीवर हमी कायदा हवा.

शासकीय आंतर महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित किसान मजदूर महापंचायतीत दिल्लीत दुसऱ्या टप्प्यातील आंदोलनाची घोषणा करण्यात आली. संयुक्त किसान मोर्चा, भारतीय किसान युनियन आणि हरियाणा आणि यूपीच्या खाप चौधरी यांनी चर्चेनंतर घोषणा केली की, एमएसपीवरील हमी कायद्यासाठी देशभरातील शेतकरी संसद भवनात महापंचायत घेणार आहेत. सर्व राज्यातील शेतकरी एकत्र दिल्लीत येतील. यावेळी शेतकऱ्यांना तयारीला लागण्याचे आवाहन करण्यात आले.

भाकियुचे राष्ट्रीय सरचिटणीस युधवीर सिंह यांनी सांगितले की, भाकियु आणि संयुक्त किसान मोर्चाचे नेते देशभरात तयारीसाठी जात आहेत. चौधरी राकेश टिकैत यांचे विविध राज्यात दौरे करत आहेत. दुसरीकडे एसएसपी संजीव सुमन आणि एडीएम प्रशासन नरेंद्र बहादूर सिंह यांच्याशी भाकियुच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर सरकारी इंटर कॉलेजच्या मैदानावरील बेमुदत संप मिटवण्यात आला.

भाकियुचे प्रवक्ते चौधरी राकेश टिकैत म्हणाले की, देशात सरकार आणि नागपूरचे धोरण सुरू आहे. कोणत्याही पीएसी, लष्कराला पाचारण केले तरी ते सक्तीने ट्यूबवेलवर वीज मीटर लावू देणार नाहीत, असा इशारा प्रशासनाला दिला. वीज मीटरच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस-प्रशासनाची असेल, शेतकरी ही जबाबदारी घेणार नाही.

किसान मजदूर महापंचायतीमध्ये भाकियुच्या प्रवक्त्याने सांगितले की, ज्या शेतकऱ्यांना त्यांच्या कूपनलिकांवर मीटर बसवायचे आहेत ते ते करू शकतात. मात्र, एकाही शेतकऱ्यावर जबरदस्ती केली जाणार नाही. कंपन्यांना वीज विकण्याचे काम सरकार करत आहे. गरिबांची पिळवणूक सुरू आहे.

# राघव आणि आनंदीच्या नव्या नात्याची सुरुवात

प्रेमाचा आठवडा सुरू झाला असून आता मराठी मालिकांमध्येदेखील (MARATHI SERIAL) प्रेमाच्या आठवड्याला सुरुवात झाली आहे. 'नवा गडी नवं राज्य' (NAVA GADI NAVA RAJYA) ही मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. आता या मालिकेत राघव आणि आनंदीच्या नव्या नात्याची सुरुवात झालेली पाहायला मिळत आहे.

आनंदी आणि राघवच्या आयुष्यात सुखाचे क्षण यावे यासाठी वर्षाने हनीमूनचा प्लॅन केला. रमाच्या नाकावर टिच्चून आनंदी राघवसोबत हनिमूनला जायला निघते. एका ठिकाणापर्यंत पोहोचल्यावर लक्षात येते की, पुढे जायला रस्ताच नाही, आनंदी हट्टाला पेटून राघवला चालत घेऊन पुढे जाते. त्या ठिकाणावर पोहोचल्यावर नेटवर्क नसल्याने राघवची चिडचिड होते, राघव इकडे येऊनसुद्धा ऑफिसच्या कामातच असल्याने आनंदी रुसली आहे.

आनंदीला मनविण्यासाठी राघव बोटीची सफर प्लॅन करतो पण अचानक तोल जाऊन तो पाण्यात पडतो. आनंदी राघवला बुडण्यापासून वाचवते, बेशुद्ध अवस्थेतल्या राघवकडे ती मनातल्या भावना व्यक्त करते, त्याचवेळेस राघवचे डोळे उघडतात आणि तो सुद्धा आपल्या मनातल्या भावना आनंदी समोर व्यक्त करतो.

'नवा गडी नवं राज्य' ही मालिका आता रोमँटिक वळणावर आली आहे. या मालिकेत आता तरी आनंदी आणि राघवचा सुखी संसार सुरू होईल की रमा पुन्हा आनंदीसमोर नवी आव्हानं निर्माण करेल हे पाहणं प्रेक्षकासाठी औत्सुक्याचं असणार आहे.

अनिता दातेची अतरंगी भूमिका

'नवा गडी नवं राज्य' या मालिकेत अनिता दाते,कश्यप परुळेकर पल्लवी पाटील, वर्षा दांदळे हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. या मालिकेत अनिता दाते अतरंगी भूमिकेत आहे. घरावर राज्य असणाऱ्या एकीचा अर्धवट राहिलेला संसार पूर्ण करायला दुसऱ्या बायकोवर आलेलं राज्य म्हणून या मालिकेचं नाव 'नवा गडी नवं राज्य' असं ठेवण्यात आलं आहे. वेगळा विषय असल्याने ही मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे.



## समृद्धी केळकरने व्यक्त केली खंत

स्टार प्रवाहवरील 'फुलाला सुगंध मातीचा' या मालिकेला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला होता. या मालिकेच्या कथानकात नेहमीच विविध ट्विस्ट पाहायला मिळाले होते. मालिकेत किर्तीची भूमिका अभिनेत्री समृद्धी केळकरने साकारली होती. या मालिकेने तिला घराघरात पोहचवले. या मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतल्याने समृद्धीचे चाहते नाराज झाले होते. मात्र आता ती लवकरच एका नव्या भूमिकेत दिसणार आहे.


'फुलाला सुगंध मातीचा' या मालिकेत तिची भूमिका सोज्वळ, खंबीर एक आदर्श पत्नी अशा पद्धतीची होती. मात्र खऱ्या आयुष्यात समृद्धी केळकर खूपच ग्लॅमर्स आहे. ती सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. ती पारंपरिक पोशाखापासून ते वेस्टर्न आऊटफिट पर्यंत सगळ्या प्रकारच्या फॅशनमधले फोटो शेअर करत असते. नुकतंच तिने वेस्टर्न आऊटफिटवर भाष्य केलं आहे. ती असं म्हणाली, "कीर्ती ही साधी सरळ होती. प्रेक्षकांनी तिला साडीत बघितलं आहे. मी बऱ्याचदा इन्स्टाग्रामवर किंवा कुठेही वेस्टर्न आऊटफिटमधले फोटो टाकले तेव्हा लोकांना ते आवडतात पण तरी ते म्हणतात आम्हाला साडीमध्ये बघायची सवय झाली आहे." अशी प्रतिक्रिया तिने दिली आहे.मी होणार सुपरस्टार जल्लोष ज्युनियर्स'चा या कार्यक्रमातुन ती आपल्या भेटीस येणार आहे. या कार्यक्रमात सुत्रसंचालकाच्या भूमिकेत दिसणार आहे. तसेच यात ती खूपच ग्लॅमर्स अवतारात दिसणार आहे. हा कार्यक्रम १८ फेब्रुवारीपासून सुरु होणार असून या कार्यक्रमाचा प्रोमो व्हायरल होत आहे. अभिनेता अंकुश चौधरी परिक्षकाच्या भूमिकेत असणार आहे.

समृद्धी एक उत्तम अभिनेत्रीच आहेच मात्र ती एक उत्तम नृत्यांगनादेखील आहे. तिने कथ्थकमध्ये अलंकारची पदवी घेतली आहे. समृद्धीने याआधी 'लक्ष्मी सदैव मंगलम' या मालिकेत भूमिका साकारली आहे. तसेच तिने 'पुढचं पाऊल' व 'लेक माझी लाडकी' या मालिकांमध्येही भूमिका



## कुडीए नी तेरे' गाण्यावर अक्षय कुमार आणि नोरा फतेही

बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार विविध कारणांमुळे सतत चर्चेत असतो. नुकताच एक व्हिडीओ अक्षयने त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला आहे. ज्यात नोरा फतेहीसोबत तो 'कुडीए नी तेरे' गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. या व्हिडीओत अक्षयने ब्लॅक कलरचा ड्रेस घातला आहे तर नोराने ग्रीन कलरचा स्टायलिश ड्रेस घातला आहे. गाण्यावर अक्षय आणि नोरा जबरदस्त डान्स करताना दिसत आहेत.अक्षय कुमार आणि नोरा फतेहीचा डान्स व्हिडीओ व्हायरल अक्षय कुमारने हा व्हिडीओ त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला असून खाली कॅप्शनमध्ये लिहिलंय की, "इकडे पहा नोरा फतेही कशाप्रकारे कोणत्याही वाईब्सला फायर बनवू शकते. कुडीए नी तेरी वाईब्स क्या है?" खरं तर या गाण्याच्या माध्यमातून अक्षय त्याच्या नव्या चित्रपटाचं प्रमोशन करत आहे. सध्या हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल या गाण्याला 1 तास साडे 8 लाख पेक्षा जास्त लाईक्स मिळाल्या आहेत. सध्या दरम्यान, सध्या व्हायरल होत असलेल्या या व्हिडीओवर चाहते खूप पसंती देत आहेत. अनेकजण यावर मजेशीर कमेंट्स करत आहेत.'सेल्फी' चित्रपटात अक्षय कुमार आणि इमरान हाशमी एकत्र'सेल्फी' चित्रपटात अक्षय कुमार आणि इमरान हाशमी पहिल्यांदा एकत्र काम करत आहेत.





# टीम इंडियाने ऑस्ट्रेलियाचा उडवला धुव्वा !

## भारताचा एक डाव अन 132 धावांनी दणदणीत विजय



। नागपूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात बॉर्डर गावसकर ट्रॉफीतील पहिला सामना नागपुरात पार पडला. शनिवारी पार पडलेल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर एक डाव आणि १३२ धावांनी विजय मिळवला. भारतीय संघाने पहिल्या डावाच्या जोरावर २२३ धावांची आघाडी घेतली होती. परंतु दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाचा संघ ३२.२ षटकात ९१ धावांवर आटोपला. भारताकडून आर आश्विनने सर्वाधिक ८ विकेट्स घेत आस्ट्रेलिया संघाला खिंडार पाडली. भारतीय संघाने आता चार सामन्यांच्या मालिकेत १- ० अशी आघाडी घेतली आहे.**

पहिल्या डावात ४०० धावा केल्यानंतर टीम इंडियाला २२३ धावांची आघाडी मिळाली. ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात सातत्याने विकेट गमावल्या. परिणामी तिसऱ्या दिवशीच संघाला मानहानीकारक पराभवाला सामोरे जावे लागले. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाकडून सर्वाधिक धावांचे योगदान दिले. त्याने ५१ चेंडूत २ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने नाबाद २५ धावा केल्या. त्याचबरोबर भारताकडून आर आश्विनने सर्वाधिक ५ विकेट्स घेत भारतीय संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.ऑस्ट्रेलिया संघाचा पहिला डाव –

नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलिया संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय ऑस्ट्रेलिया संघाला महागात पडला. त्याचा सर्व संघ ६३.५ षटकांत १७७ गुंडाळला. ऑस्ट्रेलिया संघाकडून मार्नस लाबुशेनने सर्वाधिक धावांचे योगदान दिले. त्याने ४९ धावा केल्या. अशा पद्धतीने पहिल्या डावात ऑस्ट्रेलियन संघातील एकाही फलंदाजाला अर्धशतक झळकावता आले नाही. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना रवींद्र जडेजाने सर्वाधिक पाच विकेट्स घेत ऑस्ट्रेलिया संघाला सुरुंग लावण्याचे काम केले.

बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये रोहित शर्मा पहिल्यांदाच संघाचे नेतृत्व करत आहे. मालिकेतील दुसरा कसोटी सामना १७ फेब्रुवारीपासून दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

### भारतीय संघाचा पहिला डाव

**भारतीय संघाने आपल्या पहिल्या डावात सर्वबाद ४०० धावा केल्या होत्या. भारतीय संघाकडून रोहित शर्माने सर्वाधिक धावा केल्या. त्याने २१२ चेंडूचा सामना करताना, १५ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने १२० धावांचे योगदान दिले. तसेच रवींद्र जडेजा (७०) आणि अक्षर पटेल (८४) धावा केल्या. ऑस्ट्रेलिया संघाकडून गोलंदाजी करताना टॉड मर्फीने सर्वाधिक ७ विकेट्स घेतल्या. याबरोबर त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली.**

# कपिल देवने केली विराटबद्दल भविष्यवाणी!

## कांगारूचे धाबे दणाणले : कांगारूं तिसऱ्या दिवशीच गारद

।नागपूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

नागपूर कसोटी सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर मोठा विजय नोंदवला. कांगारूंचा संघ तिसऱ्या दिवशीच गारद झाला. विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील कांगारू संघाचा एक डाव आणि 132 धावांनी पराभव करून भारताने 4 सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. पहिल्या डावात 177 धावांत गुंडाळलेल्या कांगारू संघाला दुसऱ्या डावात केवळ 91 धावा करता आल्या. भारताकडून आर अश्विन आणि जडेजाने शानदार गोलंदाजी केली.

बॉर्डर गावसकर मालिका काही मोठ्या खेळाडूंसाठी आव्हानात्मक असणार आहे. पहिल्या डावात चांगली कामगिरी करत मार्नस लॅबुशेन आणि रोहित शर्मा यांनी आत्मविश्वास उंचावला आहे. मात्र, विराट कोहली, चेतेश्वर पुजारा, डेव्हिड वॉर्नर, स्टीव्ह स्मिथ या खेळाडूंना मेहनत घ्यावी लागणार आहे.

ागपूर कसोटीच्या पहिल्या डावात स्वस्तात बाद झालेल्या कोहलीकडून कपिल देवला खूप आशा आहेत. पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात विराट कोहलीला मालिकेत दमदार सुरुवात करण्यात अपयश आले. त्याने 26 चेंडूत 12 धावा केल्या. यादरम्यान दोन चौकार मारले. मात्र संथ सुरुवातीनंतर कोहली या मालिकेत दिग्गज कपिल देवच्या नावासह चांगली कामगिरी करेल, असे चाहते आणि क्रिकेट तज्ज्ञांचे मत आहे.

कपिल देव एका यूट्यूब चॅनलवर म्हणाले की, “मला वाटते की कोहली आता प्रभाव पाडेल. कारण त्याला अजूनही भूक आहे. पहिला सामना महत्त्वाचा आहे, जर त्याने धावा केल्या तर त्याची खेळण्याची पद्धत बदलेल. जेव्हा कोणी मोठा खेळाडू असतो तेव्हा पहिला कसोटी सामना महत्त्वाचा असतो. त्याने 50 धावा केल्या तरी या मालिकेत तो 2-3 शतके ठोकेल आहेत.

ऑस्ट्रेलियात खेळल्या गेलेल्या 13 कसोटी सामन्यांमध्ये कोहलीने 25 डावात 1352 धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने 6 शतके आणि 4 अर्धशतके झळकावली आहेत. कोहलीला भारतात ऑस्ट्रेलियाविरुद्ध फारशी कामगिरी करता आलेली नाही. भारतात त्याला 11 डावात केवळ 330 धावा करता आल्या आहेत. ज्यामध्ये एक शतक आणि एक अर्धशतक आहे.



### खेळाडूंना मेहनत घ्यावी लागणार

**बॉर्डर गावसकर मालिका काही मोठ्या खेळाडूंसाठी आव्हानात्मक असणार आहे. पहिल्या डावात चांगली कामगिरी करत मार्नस लॅबुशेन आणि रोहित शर्मा यांनी आत्मविश्वास उंचावला आहे. मात्र, विराट कोहली, चेतेश्वर पुजारा, डेव्हिड वॉर्नर, स्टीव्ह स्मिथ या खेळाडूंना मेहनत घ्यावी लागणार आहे.**

## पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी

# भारताला मोठा धक्का

### उपकर्णधार स्मृती मानधना संघाबाहेर



। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना आता काही तासांवर येऊन ठेपला आहे. पण हा सामना सुरु होण्यापूर्वी आता भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. कारण भारताची उपकर्णधार स्मृती मानधना या सामन्यात खेळणार नसल्याचे आता समोर येत आहे. पाकिस्तानच्या सामन्यापूर्वी सराव करत असताना स्मृतीच्या हाताला दुखापत झाली होती. ही दुखापत गंभीर स्वरुपाची नव्हती. स्मृतीच्या हाताला फ्रॅक्चर झाले नव्हते, असेही सांगण्यात आले होते. पण स्मृतीची ही दुखापत अजूनही बरी झालेली नाही, असे समजते आहे. त्यामुळे ती आता पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात खेळणार नसल्याचे समोर आले आहे. स्मृतीबाबत आता प्रशिक्षक ऋषिकेश कानिटकर यांनी एक मोठी अपडेट दिली आहे.

भारताच्या महिला संघाचे प्रशिक्षक ऋषिकेश कानिटकर यांनी यावेळी सांगितले की, " पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी हरमनप्रीत कौर ही पूर्णपणे फिट आहे. पण स्मृतीला या सामन्यापूर्वी दुखापत झाली होती. स्मृतीच्या बोटाला दुखापत झाली होती. ही दुखापत गंभीर स्वरुपाची नव्हती. पण ती पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात खेळणार नाही, पण ती या पुढील सामन्यांमध्ये मात्र खेळणार आहे." पाकिस्तानविरुद्धचा सामना हा भारतासाठी नक्कीच महत्वाचा आहे. भारताचा हा महिला विश्वचषकातील हा पहिलाच सामना आहे. त्यामुळे या पहिल्या सामन्यात भारताला धक्का बसला आहे. कारण स्मृती ही चांगल्या फॉर्मात होती. स्मृती सातत्याने धावा करत होती, त्यामुळेच तिला संघाचे उपकर्णधारपद देण्यात आले होते. त्यामुळे स्मृती या विश्वचषकात कशी कामगिरी करते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते.